# राजकीय पक्ष

**प्र.२ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

## राजकीय पक्षाचा अर्थ

***१. राजकीय पक्ष म्हणजे काय?** **[जुलै १६]**

**उत्तर:** समान राजकीय भूमिका असलेल्या लोकांचा गट किंवा समूह म्हणजे 'राजकीय पक्ष' होय.

**२. पक्षाचे धोरण किंवा कार्यक्रम कशाला म्हणतात?**

**उत्तर:** राजकीय पक्ष सर्व सदस्यांच्या एकमताने विविध सामाजिक प्रश्नांबाबत आपली भूमिका ठरवतात, यालाच पक्षाचे धोरण किंवा कार्यक्रम म्हणतात.

**३. नागरिक राजकीय पक्षांशी कशा प्रकारे जोडले जातात?**

**उत्तर:** जेव्हा राजकीय पक्षांचे धोरण मान्य असणारे किंवा आवडणारे नागरिक त्या पक्षाक्षी जोडले जाऊन त्याचे सदस्य म्हणून कार्य करतात, तेव्हा नागरिक राजकीय पक्षांशी जोडले जातात.

**४. सत्ताधारी पक्ष म्हणून कोणास ओळखले जाते?** **[मार्च १६]**

**उत्तर:** निवडणुकीत बहुमत प्राप्त झालेले पक्ष सत्ताधारी पक्ष म्हणून ओळखले जातात.

***५ सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षातील एक फरक सांगा**

**उत्तर:** निवडणुकीत बहुमत प्राप्त झालेले पक्ष सत्ताधारी पक्ष म्हणून ओळखले जातात, तर बहुमत न मिळवू शकलेला पक्ष विरोधी पक्ष म्हणून काम करतो.

## पक्ष पद्धती

---

**६. पक्ष पद्धतीचे वर्गीकरण कशा प्रकारे करण्यात येते?**

**उत्तर:** एखाद्या देशात किती राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत व एका वेळी किती पक्षांना सत्ता मिळते, यावरून पक्ष पद्धतीचे वर्गीकरण केले जाते.

**७. लोकशाहीतील विविध पक्ष पद्धती सांगा.**

**किंवा**

***कोणत्याही दोन पक्ष पद्धती सांगा.**

**उत्तर:** एकपक्ष पद्धती, द्विपक्ष पद्धती, बहुपक्ष पद्धती या लोकशाहीत आढळून येणाऱ्या पक्ष पद्धती आहेत.

**८. राजकीय पक्षांचे प्रमुख उद्दिष्ट कोणते असते?**

**[मार्च १४]**

**उत्तर:** सत्ता प्राप्त करणे व ती टिकवणे हे राजकीय पक्षांचे प्रमुख उद्दिष्ट असते.

**९. भारतात निवडणुकीसाठी उमेदवारांची निवड कशा प्रकारे करण्यात येते?**

**उत्तर:** भारतात पक्षातील वरिष्ठ नेते उमेदवारांची निवड करतात.

**१०. राजकारणात तिकीट म्हणजे काय?**

**उत्तर:** राजकारणात उमेदवाराला पक्षाकडून जी उमेदवारी मिळते, त्यालाच तिकीट असे म्हणतात.

**११. राजकीय पक्षांवर टीका करणाऱ्या माध्यमांची नावे सांगा.**

**उत्तर:** चळवळी, प्रसारमाध्यमे, बिगर शासकीय संघटना आणि नागरिक हे राजकीय पक्षांवर टीका करतात.

**१२. जगातील कोणत्या देशांमध्ये राजकीय पक्षांवर बंदी आहे? [मार्च १४]**

**उत्तर:** कतार, ओमान, संयुक्त अरब अमिरात या देशात राजकीय पक्षांवर बंदी आहे.

## राजकीय पक्षांचे प्रकार आणि कार्ये

**१३. राजकीय पक्षांची रचना कशी असते?**

**उत्तर:** प्रत्येक राजकीय पक्षात नेते, सक्रिय कार्यकर्ते आणि पक्षाचे पाठीराखे किंवा पाठिंबा देणारे लोक अशी रचना असते.

**१४. कायद्याचा मसुदा संसदेत कोण सादर करू शकतो?**

**उत्तर:** सत्ताधारी पक्षाचा मंत्री किंवा कोणताही संसद सदस्य कायद्याचा मसुदा किंवा विधेयक सादर करू शकतो.

## मान्यताप्राप्त राजकीय पक्ष

**१५. भारतातील राजकीय पक्षांचे प्रमुख प्रकार किती व कोणते? [ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** भारतात राजकीय पक्षांचे प्रमुख दोन प्रकार आहेत – राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष आणि

या दोन्ही प्रकारांत सत्ताधारी व विरोधी पक्ष असे दोन प्रकार आढळतात.

**१६. पक्षांच्या उमेदवाराला अपक्ष उमेदवार म्हणून केव्हा ओळखले जाते?**

**उत्तर:** जर पक्ष निवडणूक आयोगाद्वारे नोंदणीकृत नसेल, तर अशा पक्षांच्या उमेदवारांनी पक्षाच्या नावाने प्रचार केला, तरीही त्यांना 'अपक्ष' उमेदवार म्हणूनच अधिकृतपणे ओळखले जाते.

## भारतातील राष्ट्रीय पक्ष

**१७. बहुजन समाज पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट काय आहे?**

**उत्तर:** बहुजन समाजाला सत्ता मिळवून देणे तसेच दलित व शोषित समाजाचे कल्याण हे बहुजन समाज पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**१८. बहुजन या संकल्पनेत कोणत्या जनतेचा समावेश होतो?**

**उत्तर:** बहुजन या संकल्पनेत दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय आणि धार्मिक अल्पसंख्यांक जनतेचा समावेश होतो.

**१९. कोणत्या राज्यात बहुजन समाज पक्षाला निवडणुकीत यश मिळाले आहे?**

**उत्तर:** उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, बिहार, दिल्ली, छत्तीसगढ, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा या राज्यांत बहुजन समाज पक्षाला निवडणुकीत यश मिळाले आहे.

**•२०. निवडणुकीत 'बाहेरून पाठिंबा' कशाला म्हणतात?**

**उत्तर:** काही राजकीय पक्ष आघाडी किंवा युती सरकारमध्ये सामील न होता सत्तेवर असलेल्या पक्षाला पाठिंबा देतात, त्याला 'बाहेरून पाठिंबा' असे म्हटले जाते.

**२१. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची विचारधारा काय आहे?**

**उत्तर:** मार्क्सवाद हा कम्युनिस्ट पक्षाचा प्रमुख विचार तसेच धर्मनिरपेक्षता आणि लोकशाहीवर या पक्षाचा विश्वास आहे.

**२२. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या विभाजनानंतर निर्माण झालेल्या नवीन पक्षाचे नाव काय आहे?**

**उत्तर:** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे विभाजन झाल्यानंतर त्यातून भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी हा नवीन पक्ष तयार झाला.

**२३. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा ज्या राज्यांत सर्वांत जास्त प्रभाव आहे त्यांची नावे लिहा.**

**उत्तर:** केरळ, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मणिपूर, पंजाब, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव आहे.

**•२४. मार्क्सवादाचे मुख्य उद्दिष्ट काय आहे?**

**उत्तर:** समाजातील विषमता आणि शोषण यांविरुद्ध संघर्ष करून समता स्थापन करणे हे मार्क्सवादाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**२५. भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी यांची विचारधारा काय आहे?**

**उत्तर:** समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही ही भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी यांची मुख्य तत्त्वे आहेत. जमातवाद व साम्राज्यवादाला त्यांचा तीव्र विरोध आहे.

**२६. भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी यांचा प्रभाव सर्वांत जास्त समाजातील कोणत्या गटांमध्ये आहे?**

**उत्तर:** भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी यांचा प्रभाव औद्योगिक कामगार, गरीब, शेतकरी आणि शेतमजूर या गटांमध्ये आहे.

**२७. कोणत्या धोरणाला भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी विरोध करतो?**

**उत्तर:** भारतात परदेशातील कंपन्यांनी गुंतवणूक करावी याला प्रेरणा देणाऱ्या नव्या धोरणाला भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी विरोध करतो.

**२८. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा भारतातील कोणत्या राज्यात प्रभाव आहे?**

**उत्तर:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मुख्यत: महाराष्ट्र, तसेच मेघालय, मणिपूर, नागालँड आणि आसाम या राज्यांमध्ये प्रभाव आहे.

**•२९. आर्थिक साम्राज्यवाद म्हणजे कांय?**

**उत्तर:** औद्योगिक क्रांतीनंतर स्वत:च्या देशासाठी जास्तीत जास्त आर्थिक फायदे मिळवणे हे साम्राज्यवादाचे उद्‌दिष्ट बनले, याला 'आर्थिक साम्राज्यवाद' असे म्हटले जाते.

## राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष

***३०. 'राज्यस्तरीय' किंवा 'प्रादेशिक पक्ष' म्हणजे काय? [मार्च १५, जुलै १६]**

**उत्तर:** ज्या पक्षाचा प्रभाव एखाद्या घटक राज्यापुरता मर्यादित असतो, त्या पक्षाला 'राज्यस्तरीय' किंवा 'प्रादेशिक पक्ष' असे म्हणतात.

**३१. महाराष्ट्रातील दोन मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षांची नावे लिहा.**

**उत्तर:** महाराष्ट्रात शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे दोन मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष आहेत.

**३२. शिवसेना पक्षाची सुरुवात कोणत्या भूमिकेतून झाली?**

**उत्तर:** महाराष्ट्र हा मराठी लोकांसाठी आहे, या भूमिकेतून शिवसेना या पक्षाची सुरुवात झाली आहे.

**३३. महाराष्ट्रात मर्यादित प्रभाव असणाऱ्या सहा प्रादेशिक पक्षांची नावे लिहा.**

**उत्तर:** महाराष्ट्रात मर्यादित प्रभाव असणारे प्रादेशिक पक्ष:

i. शेतकरी कामगार पक्ष

ii. बहुजन विकास आघाडी

iii. जनसुराज्यशक्ती

iv. लोकसंग्राम पक्ष

v. राष्ट्रीय समाज पक्ष

vi. समाजवादी पक्ष

## प्र.३. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

### राजकीय पक्षाचा अर्थ

***१. समान राजकीय भूमिका असलेले लोक राजकीय पक्ष स्थापन करतात. [जुलै १५, १६]**

**उत्तर: बरोबर**

i. राजकीय पक्ष हा एखाद्या विषयावर एकाच प्रकारची मते असणाऱ्या लोकांचा समूह असतो.

ii. राजकीय प्रश्नांबाबत पक्षातील सर्व सदस्यांचे मत एक असते.

iii. विविध सामाजिक प्रश्नांबाबत राजकीय पक्ष आपली भूमिका ठरवितात. त्यालाच पक्षाचे धोरण म्हणतात. ते धोरण मान्य असणारे किंवा समान राजकीय भूमिका असणारे लोक एकत्र येऊन राजकीय पक्ष स्थापन करतात.

***२. जेव्हा दोन किंवा दोनपेक्षा जास्त पक्ष एकत्र येऊन सरकार बनवतात तेव्हा ती द्विपक्ष पद्धती असते.**

**उत्तर: चूक**

i. एखाद्या देशात किती राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत व एका वेळी किती पक्षांना सत्ता मिळते यावरून पक्ष पद्धतीचे वर्गीकरण केले जाते.

ii. द्विपक्ष पद्धतीत काही देशांत दोन पक्ष प्रभावी असून सत्ता मात्र एकाच पक्षाला मिळते, तर काही देशांत दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे आळीपाळीने सत्तेवर येऊ शकतात.

iii. तसेच, दोन किंवा दोनपेक्षा जास्त पक्ष सत्तेवर एकत्रित येतात, ती बहुपक्ष पद्धती होय.

## राजकीय पक्षांची कार्ये

**३. लोकशाहीत विरोधी पक्ष असणे महत्त्वाचे मानले जाते. [ऑक्टोबर १४]**

**उत्तर: बरोबर**

i. जनतेच्या हितसंबंधाविरोधी असणाऱ्या धोरणाबाबत विरोधी पक्ष टीका करतात.

ii. मोर्चे, निदर्शने करून अशी अन्यायकारक धोरणे रद्द करण्याची मागणी करतात.

iii. सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्ष करतात.

म्हणून, लोकशाहीत विरोधी पक्ष असणे महत्त्वाचे मानले जाते.

## मान्यताप्राप्त राजकीय पक्ष

**४. राजकीय पक्षाला निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळणे महत्त्वाचे असते.**

**उत्तर: बरोबर**

i. राजकीय पक्षाला राष्ट्रीय किंवा राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता देण्यासाठी निवडणूक आयोग वेळोवेळी निकष निश्चित करतो.

ii. त्यात प्रामुख्याने किमान जागा व किमान मते या अटींचा समावेश असतो.

iii. अशी मान्यता मिळाल्यास त्या पक्षासाठी राज्यात किंवा देशभर एकच निवडणूक चिन्ह राखून ठेवले जाते.

म्हणून, राजकीय पक्षाला निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळणे महत्त्वाचे असते.

## भारतातील राष्ट्रीय पक्ष

***५. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यस्तरीय पक्ष आहे.**

**[मार्च १५]**

**उत्तर: चूक**

i. राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता देण्यासाठी निवडणूक आयोग वेळोवेळी निकष निश्चित करतो.

ii. यात प्रामुख्याने किमान जागा व किमान मते या अटींचा समावेश असतो.

iii. राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठीच्या सर्व अटी राष्ट्रवादी काँग्रेसने पूर्ण केल्या आहेत, तसेच या पक्षाचा प्रभाव राज्यस्तरावर मर्यादित नसून राष्ट्रीय पातळीवरही आहे.

म्हणून, राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय पक्ष आहे.

## राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष

**६. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मुख्य प्रभाव कर्नाटक राज्यात आहे. [मार्च १६]**

**उत्तर: चूक**

i. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मुख्य प्रभाव महाराष्ट्र राज्यात आहे.

ii. मेघालय, मणिपूर, नागालँड आणि आसाम या राज्यांमध्ये या पक्षाचा प्रभाव आहे.

**७. महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा एक प्रादेशिक पक्ष आहे.**

**उत्तर: बरोबर**

i. महाराष्ट्र नवनिर्माण सेना फक्त महाराष्ट्रात कार्यरत आहे.

ii. महाराष्ट्र राज्य, मराठी माणूस व भाषा यांना भौतिक व सांस्कृतिक वैभव प्राप्त करून देणे हे या पक्षाचे प्रमुख ध्येय आहे.

म्हणून, महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा प्रादेशिक पक्ष आहे.

## प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० शब्दांत लिहा.

### पक्ष पद्धती

**१. पक्ष पद्धतीचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर:** पक्ष पद्धतीचे वेगवेगळे प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

**i. एकपक्ष पद्धती :**

एकपक्ष पद्धतीमध्ये एकच पक्ष अस्तित्वात असतो किंवा एकच पक्ष प्रभावी असतो. म्हणजेच फक्त एकाच पक्षाकडे सरकार स्थापन करण्याची क्षमता असते.

**ii. द्विपक्ष पद्धती :**

काही देशांत दोन पक्ष प्रभावी असतात; पण सत्ता मात्र एकाच पक्षाला मिळते, तर काही देशांत दोन पक्ष प्रभावी असतात आणि ते दोन्हीही पक्ष स्वतंत्रपणे आळीपाळीने सत्तेवर येऊ शकतात. याला द्विपक्ष पद्धती असे म्हणतात.

**iii. बहुपक्ष पद्धती :**

दोन किंवा दोनपेक्षा जास्त पक्ष सत्तेवर एकत्रित येतात, ती बहुपक्ष पद्धती होय. बहुपक्ष पद्धतीमध्ये अनेक पक्ष प्रभावी असतात आणि एकमेकांशी स्पर्धा करतात; पण कोणत्याच एका पक्षाला सरकार स्थापन करता येत नाही.

**•२. आघाडी किंवा युती सरकार म्हणजे काय?**

**उत्तर:** i. जेव्हा एका पक्षाला सरकार बनविण्यासाठी आवश्यक बहुमत मिळत नाही तेव्हा दोन किंवा त्यापेक्षा अधिक पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतात, याला आघाडीचे किंवा युतीचे सरकार असे म्हणतात.

ii. आघाडीला लोकसभेत ५० टक्के सदस्यांचा पाठिंबा म्हणजेच साधे बहुमत मिळवावे लागते.

iii. १९९६ मध्ये सत्तेवर आलेले आघाडी सरकार बहुमत न मिळाल्यामुळे १३ दिवसच टिकले.

**#३. भारतात राजकीय पक्षांना चिन्ह का दिले जाते?**

**उत्तर:** मतदान करताना निरक्षर लोकांना पक्ष ओळखणे सोपे जावे, म्हणून राजकीय पक्षांना चिन्ह दिले जाते.

**४. भारतातील राजकीय पक्षांचे प्रकार लिहा.**

**उत्तर:** भारतातील राजकीय पक्षांचे प्रभाव क्षेत्रावरून दोन प्रकार आहेत;

i. राष्ट्रीय पक्ष

ii. राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष

दोन्ही प्रकारांत सत्ताधारी आणि विरोधी असे दोन प्रकार आढळतात.

***५. राजकीय पक्षांची कार्ये लिहा.**

**उत्तर:** राजकीय पक्षांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत:

**i. धोरणे ठरविताना सहभाग घेणे:**

राजकीय पक्ष आपली धोरणे आणि कार्यक्रम ठरवून, त्यांचा प्रचार करून निवडणुका लढवतात.

**ii. सरकार तयार करणे आणि राज्यकारभार चालविणे:**

निवडून आलेला पक्ष सरकार तयार करते व ते चालवते. जे पक्ष सत्तेवर येतात ते लोकांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात आणि

त्याबदल्यात जास्तीत जास्त लोकांकडून पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात.

iii. **कायदेनिर्मितीत सहभाग घेणे:**

कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेतही राजकीय पक्ष महत्त्वाची भूमिका बजावतात. विधेयके सादर करणे, त्यावर टीका-टिपण्णी करणे, चर्चा-वादविवाद करणे ही कार्ये राजकीय पक्ष करतात. सत्ताधारी पक्ष त्यांना असलेल्या बहुमताच्या जोरावर कायदे तयार करतात.

iv. **जनजागृती/लोकशिक्षण:**

सभा, मेळावे, अधिवेशन, पत्रके अशा माध्यमांतून राजकीय पक्ष नागरिकांना राजकारणाचे ज्ञान देतात. नागरिकांचा लोकशाहीत सहभाग वाढविण्यासाठी राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरते.

v. **विरोधी पक्ष म्हणून काम करणे:**

अन्यायकारक व जनतेच्या हितसंबंधांविरोधी असणाऱ्या धोरणांवर टीका करून ते रद्द करण्याची मागणी विरोधी पक्ष मोर्चे, निदर्शने यातून करू शकतात.

vi. **जनता व सरकारमधील दुवा म्हणून काम करणे:** राजकीय पक्ष हे सरकार आणि जनता यांच्यामधील दुवा म्हणून काम करतात. जनतेच्या इच्छा, मागण्या सरकारकडे पोहोचवण्याचे आणि सरकारी धोरणांची किंवा योजनांची माहिती जनतेला देण्याचे काम राजकीय पक्ष करतात.

**६. लोकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा का निर्माण होतात?**

**उत्तर:** i. राजकीय पक्ष लोकांच्या मागण्या पूर्ण करून त्या बदल्यात जास्तीत जास्त लोकांकडून पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात.

ii. जर राजकीय पक्षांनी जनतेच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर पुढच्या निवडणुकीत पराभूत होण्याची त्यांना सतत भीती असते.

त्यामुळे, लोकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा निर्माण होतात.

**७. लोकशाहीचे संरक्षण करणारा पहारेकरी अशी विरोधी पक्षांची भूमिका असते. स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. ज्या पक्षांना निवडणुकीत बहुमत प्राप्त होत नाही ते पक्ष विरोधी पक्ष म्हणून भूमिका बजावतात.

ii. जनतेवर अन्याय होत असेल, तर विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षांची अन्यायकारक धोरणे रद्द करण्याची मागणी करू शकतात.

iii. जनतेच्या हितसंबंधांविरोधी असणाऱ्या धोरणांबाबत विरोधी पक्षांकडून मोर्चे, निदर्शने केली जातात, यामुळे सरकारवर अंकुश ठेवला जातो.

उदा. घरगुती गॅस, पेट्रोल, अन्नधान्यांच्या वाढलेल्या किमती, अनियमित पाणीपुरवठा इ. प्रश्नांवर आंदोलने केली जातात.

अशा प्रकारे, लोकशाहीचे संरक्षण करणारा पहारेकरी अशी विरोधी पक्षांची भूमिका असते.

***८. 'राजकीय पक्ष हे जनता आणि सरकारमधील दुवा असतात' हे स्पष्ट करा. [मार्च १४]**

**उत्तर:** i. राजकीय पक्षांमार्फत जनता शासकीय यंत्रणेपर्यंत जोडली जाते.

ii. जनतेच्या इच्छा, आकांक्षा, मागण्या सरकारकडे पोहोचविण्याचे तसेच सरकारी धोरणांची किंवा योजनांची माहिती जनतेला देण्याचे काम राजकीय पक्ष करतात.

iii. आपणही सरकारमध्ये सहभागी होऊ शकतो, असा विश्वास राजकीय पक्षांमुळे जनतेला मिळू शकतो.

iv. सरकारी धोरणे व योजना यावर जनतेच्या प्रतिक्रिया घेऊन त्या सरकारला सांगण्याचे काम राजकीय पक्ष करतात.

अशा रीतीने, राजकीय पक्ष हे जनता आणि सरकारमधील दुवा असतात.

**९. राजकीय पक्षासाठी मान्यता का महत्त्वाची असते?**

**उत्तर:** i. राज्यपातळीवरील पक्ष किंवा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता देण्यासाठी निवडणूक आयोग वेळोवेळी निकष निश्चित करतो. त्यात प्रामुख्याने किमान जागा व किमान मते या अटींचा समावेश असतो.

ii. राजकीय पक्षाला राज्यपातळीवरील किंवा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली, की पक्षासाठी राज्यात किंवा देशभर एकच निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाकडून राखून ठेवले जाते, म्हणून राजकीय पक्षांच्या दृष्टीने या मान्यतेला महत्त्व असते.

**•१०. राष्ट्रीय पक्ष म्हणून राजकीय पक्षाला मान्यता कशा प्रकारे मिळवता येते?**

**उत्तर:** 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून मान्यता मिळवण्यासाठी खालीलपैकी कोणतीही एक अट पूर्ण करावी लागते:

i. किमान चार राज्यांमध्ये शेवटच्या लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत, किमान ६% मते मिळणे आणि एकूण ४ सभासद लोकसभेत निवडून येणे,

किंवा

ii. आधीच्या लोकसभा निवडणुकीत किमान तीन राज्यांमध्ये मिळून किमान २% लोकसभा सदस्य (लोकसभेच्या एकूण जागांपैकी) निवडून येणे,

किंवा

iii. किमान चार राज्यांमध्ये राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळणे.

## ११. भारतातील राष्ट्रीय पक्षांची नावे लिहा.

**उत्तर:** भारतातील राष्ट्रीय पक्षांची नावे खालीलप्रमाणे:

i. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
ii. भारतीय जनता पक्ष
iii. बहुजन समाज पक्ष
iv. भारतीय कम्युनिस्ट पक्ष
v. भारतीय कम्युनिस्ट पक्ष – मार्क्सवादी
vi. राष्ट्रवादी काँग्रेस

## १२. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष यावर टीप लिहा.

**उत्तर:** i. १८८५ मध्ये स्थापना झालेला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा काँग्रेस पक्ष म्हणून ओळखला जातो.

ii. हा पक्ष धर्मनिरपेक्षता, समाजातील दुर्बल आणि अल्पसंख्यांक वर्गाचे हित साधण्यासाठी प्रयत्नशील आहे.

iii. १९४७ ते १९७७ पर्यंत व १९८० ते १९८९ या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा केंद्र सरकारमध्ये सत्ताधारी पक्ष होता.

iv. १९९१ मध्ये या पक्षाला बहुमत मिळू शकले नाही; परंतु इतर पक्षांच्या पाठिंब्याने तो सत्तेवर आला.

v. १९९६ पासून २००४ पर्यंत काँग्रेस पक्ष सत्तेत नव्हता. २००४ पासून काँग्रेस पक्ष हा संयुक्त पुरोगामी आघाडीचे नेतृत्व करत सत्तेवर होता.

**टीप:** संयुक्त पुरोगामी आघाडी मे २०१४ पर्यंत सत्तेवर होती.

**१३. भारतीय जनता पक्षाची उद्दिष्टे काय आहेत?**

**उत्तर:** भारतीय जनता पक्षाची उद्दिष्टे:

i. बलशाली आणि वैभवसंपन्न आधुनिक भारत निर्माण करणे.

ii. प्राचीन भारतीय संस्कृती आणि परंपरा यांचे जतन करणे.

iii. भारतीय राजकारणात सांस्कृतिक राष्ट्रवाद व हिंदुत्व यांवर भर देणे.

**१४. भारतीय जनता पक्षाच्या मागण्या काय आहेत?**

**उत्तर:** भारतीय जनता पक्षाच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत:

i. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम रद्द करावे.

ii. सर्व धर्मांच्या नागरिकांसाठी विवाह, घटस्फोट, दत्तक, इत्यादींसाठी एकसारखा म्हणजेच समान नागरी कायदा लागू व्हावा.

iii. सक्तीच्या धर्मांतरावर बंदी असावी.

**१५. भारतीय जनता पक्षाच्या वाढत्या प्रभावाबद्दल माहिती लिहा.**

**उत्तर:** i. १९९० च्या दशकापासून भारतीय जनता पक्षाचा प्रभाव वाढू लागला.

ii. देशाच्या राजकारणात १९९८ च्या दशकापासून भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी केंद्रात सत्तेवर आली. २००४ पर्यंत ही आघाडी सत्तेवर होती.

**टीप:** पुन्हा मे २०१४ पासून केंद्रात सरकार स्थापन करून आजतागायत हा पक्ष सत्तेवर आहे.

***१६. भारतीय कम्युनिस्ट पक्ष यावर टीप लिहा.**

**उत्तर:** i. १९२५ मध्ये स्थापना झालेला हा पक्ष कामगार, शेतकरी आणि गरिबांच्या हितासाठी प्रयत्नशील आहे.

ii. मार्क्सवाद हा या पक्षाचा प्रमुख विचार असून धर्मनिरपेक्षता आणि लोकशाहीवर पक्षाचा विश्वास आहे.

iii. केरळ, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मणिपूर, पंजाब, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांत पक्षाचा प्रभाव आहे.

iv. १९६४ मध्ये पक्षाचे विभाजन होऊन भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा नवीन पक्ष तयार झाला.

**•१७. मार्क्सवादाच्या विचारानुसार समाजात कोणत्या दोन प्रकारचे वर्ग आहेत?**

**उत्तर:** मार्क्सवादानुसार समाजात दोन प्रकारचे वर्ग असतात,

i. 'आहे रे' वर्ग – ज्याच्याकडे उत्पादन साधनांची मालकी असते.

ii. 'नाही रे' वर्ग – ज्यांच्याकडे उत्पादन साधनांची मालकी नसते.

यांपैकी 'आहे रे' वर्ग 'नाही रे' वर्गाचे शोषण करतो.

**•१८. कार्ल मार्क्स यांच्या मते शोषण झालेल्या वर्गाने काय करायला हवे?**

**उत्तर:** i. कार्ल मार्क्स यांच्या मते, 'शोषण झालेल्या वर्गाने क्रांती करून सत्ता हस्तगत करावी. यानंतरच वर्गविरहित म्हणजे समतेवर आधारित समाज निर्माण होईल.'

ii. तसेच कामगार वर्गाचे सर्वाधिक शोषण होते; म्हणून कार्ल मार्क्स यांना कामगार वर्गाकडून क्रांती होणे अपेक्षित होते.

**१९. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तत्त्वे कोणती आहेत?**

**उत्तर:** i. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष लोकशाही, समता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, गांधीवादी तत्त्वांना आणि संघराज्यवाद यांना पाठिंबा देतो.

ii. समाजातील दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी पक्ष प्रयत्नशील आहे.

iii. भारतातील महत्त्वाची पदे भारतात जन्मलेल्या व्यक्तीलाच मिळावीत असा या पक्षाचा आग्रह आहे.

**•२०. 'साम्राज्यवाद' कशाला म्हणतात?**

**उत्तर:** i. जगातील सामर्थ्यवान देशांनी स्वतःच्या सीमा ओलांडून आपल्या राज्याचा विस्तार केला.

ii. लष्करी ताकद वापरून जवळचे प्रदेश तसेच जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्यामध्ये होती. या प्रादेशिक विस्तारालाच 'साम्राज्यवाद' असे म्हणतात.

**•२१. संघराज्यवाद म्हणजे काय?**

**उत्तर:** i. शासनाचा एक प्रकार किंवा तत्त्व म्हणून संघराज्यवाद ओळखला जातो. यामध्ये सत्ता ही केंद्र किंवा संघ सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये विभागून दिलेली असते.

ii. यामध्ये केंद्र सरकार इतकेच महत्त्व राज्य सरकारला असते.

उदा. अमेरिका संघराज्य

**•२२. जमातवाद म्हणजे काय?**

**उत्तर:** i. जमातवाद म्हणजे एका जमातीचे किंवा धर्माचे वर्चस्व इतर जमाती किंवा धर्मावर असावे असे मानणारा विचार.

ii. जमातवादामुळे दोन जमाती किंवा धर्म एकत्र राहू शकत नाहीत. यातून समाजाचे किंवा देशाचे विभाजन घडून येते.

**•२३. गांधीवादी तत्त्वे कोणती?**

**उत्तर:** i. गांधीवादी तत्त्वे ही प्रत्येक व्यक्ती आणि समूहासाठी गांधींच्या विचारातून निर्माण झालेली आहेत.

ii. सत्य, अहिंसा, शांतता, खेड्यांचा विकास आणि समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देणे ही गांधीवादी तत्त्वे आहेत.

**•२४. सामाजिक न्यायाची ध्येय-धोरणे स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमता नष्ट करणे हे सामाजिक न्यायाचे मुख्य उद्‌दिष्ट असते.

ii. व्यक्तीची प्रतिष्ठा जपणे हे सामाजिक न्यायाचे ध्येय असते.

iii. संधीची समानता हा सामाजिक न्यायाचा आधार आहे.

iv. धर्म, जात, पंथ, स्त्री-पुरुष अशा कोणत्याही विषमतेच्या कारणावरून अन्याय होऊ नये, असे सामाजिक न्यायाचा विचार सांगतो.

## राज्यस्तरीय किंवा प्रादेशिक पक्ष

**२५. भारतात राष्ट्रीय पातळीवरील पक्षांना सरकार स्थापन करण्यासाठी प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा का घ्यावा लागतो?**

**उत्तर:** राष्ट्रीय पातळीवरील पक्षांना सरकार स्थापन करण्यासाठी प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा पुढील कारणांमुळे घ्यावा लागतो:

i. १९९० च्या दशकापासून भारतात कोणत्याही एका पक्षाला लोकसभेत बहुमत मिळवता आले नाही.

ii. १९९६ पासून जवळपास सर्व राज्यपातळीवरील पक्ष केंद्र सरकारचे घटक पक्ष बनले आहेत.

iii. भारतीय राजकारणात राज्यस्तरीय पक्षांचे महत्त्व वाढत चालले आहे.

**२६. महाराष्ट्रात शिवसेनेने कशा प्रकारे सरकार स्थापन केले?**

**उत्तर:** i. महाराष्ट्र हा मराठी लोकांसाठी आहे, या भूमिकेतून बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली १९६६ ला मुंबईत शिवसेनेची स्थापना झाली.

ii. मराठीबरोबरच हिंदू राष्ट्रवादाच्या मुद्द्याच्या आधारे शिवसेनेने १९८९ मध्ये भारतीय जनता पक्षाशी युती केली व १९९५ मध्ये महाराष्ट्रात सरकार स्थापन केले.

***२७. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाबद्दल माहिती लिहा.**

**उत्तर:** i. शिवसेनेतून बाहेर पडलेल्या एका गटाने, २००६ मध्ये मुंबई येथे, राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली.

ii. महाराष्ट्र राज्य आणि मराठी भाषा यांना भौतिक व सांस्कृतिक वैभव प्राप्त करून देणे या पक्षाचे प्रमुख ध्येय आहे.

iii. महाराष्ट्राच्या विकासासाठी जात, धर्म, पंथ किंवा वर्ग यांचा विचार न करता महाराष्ट्रातील सर्व लोकांना एकत्र आणणे अशी पक्षाची भूमिका आहे.

iv. २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत या पक्षाला १३ जागा मिळाल्या होत्या.

## संकीर्ण

**२८. 'राजकीय पक्ष सामान्य जनतेला जवळचे वाटतात' हे विधान स्पष्ट करा. [जुलै १५]**

**उत्तर:** i. आपल्या रोजच्या जीवनातल्या समस्या राजकीय पक्षांकडून सोडविल्या जातील असा लोकांना विश्वास वाटतो.

ii. राजकीय पक्षांना लोक यासाठीच पाठिंबा देतात.

iii. लोकांच्या इच्छा आणि आकांक्षा पूर्ण करण्याचे काम राजकीय पक्ष करतात.

iv राजकीय पक्षांद्वारे लोक शासनाच्या कारभारात भाग घेऊ शकतात.

म्हणून, राजकीय पक्ष सामान्य जनतेला जवळचे वाटतात.